**वानिकी आणि वन्यजीव क्षेत्रास**
**प्राधान्य क्षेत्र घोषित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन,**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : डब्ल्युएलपी-१००३/प्र.क्र. १४५/फ-१,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १४ नोव्हेंबर २००३

**शासन निर्णयः-**

राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी सुमारे २० % पर्यंत क्षेत्र वनक्षेत्राखाली आहे. राज्यात सध्या ५ राष्ट्रीय उद्याने, ३६ वन्यजीव अभयारण्ये आणि ३ व्याघ्र प्रकल्प असून, राज्यात विपूल अशी वन्यजीव संपदा आहे. वन आणि वन्यप्राणी हा मानवासाठी एक नैसर्गिक संपदा असून, त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे व त्यासाठी राज्यस्तरावर पावले उचलणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने वन्यप्राणी व त्यांचे अधिवासाचे संरक्षण व संवर्धनाचे महत्व विचारात घेता, राष्ट्रीय वन्यजीव कृती आराखडा २००२-२०१६ जाहिर केलेला आहे. त्यानुसार वानिकी आणि वन्यजीव क्षेत्रास प्राधान्य क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत राज्य शासनास सुचविले होते. त्यानुषंगाने दिनांक २२-८-२००२ रोजी झालेल्या राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाच्या ३१ व्या बैठकीत सर्व सदस्यांनी एकमताने याबाबत शिफारस केलेली आहे. वरील प्रमाणे केंद्र शासनाने दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने व राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाच्या शिफारशी विचारात घेता, या शासन निर्णयान्वये राज्यात वानिकी आणि वन्यजीव क्षेत्रास प्राधान्य क्षेत्र (PRIORITY SECTOR) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र.क्र. ५८७/०३/व्यय-१० दि. २०.९.२००३ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( संजीव गौड )
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,
मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.